8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## राज्यात पाणी टंचाईच्या झळा!

**मुंबई -** राज्यातील धरणसाठा आता ३८.९५ टक्क्यांवर आलाय. पुणे, छत्रपती संभाजीनगर, कोकण, विदर्भातील सर्व मोठ्या धरणांचा पाणीसाठा आता झपाट्यानं खाली घसरलाय. एकीकडे तापमानाच्या झळा आणि दुसरीकडे पाणीटंचाई अशा दुहेरी कात्रीत राज्यातील बहुतांश भागातील नागरिक सापडले आहेत. अकोल्यात पाणी चोरीला जाऊ नये म्हणून पाण्याच्या टाक्यांना कुलूप लावले जात आहेत. मराठवाड्यात १०-१२ दिवसांनी एकदा नळाला पाणी येतानाचे चित्र पुन्हा सुरु झाले आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये पाण्याच्या नियोजनावरून नागरिकांमध्ये रोष दिसून येत आहे. राज्यभरात पाणीटंचाईचा प्रश्न चांगलाच पेटला आहे. दरम्यान, धरणांमध्ये किती पाणी शिल्लक आहे?

महाराष्ट्राच्या सहा महसूल विभागांपैकी पुणे, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर या तीन विभागातील धरणांमध्ये आता ४० टक्क्यांहूनही कमी पाणी शिल्लक आहे. पुणे विभागात राज्यातील सर्वात कमी पाणीसाठा आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत काही टक्क्यांनी पाणीसाठा अधिक असला तरी काही प्रमुख धरणे एप्रीलमध्यावरच मायनसच्या दिशेने वाटचाल करू लागली आहेत. त्यामुळे शेतीच्या पाण्यासह पिण्याच्या पाण्याची चिंता व्यक्त केली जात आहे. गेल्या वर्षी याच सुमारास पाणीसाठा ३३.६२% एवढा होता. तो यंदा ३८.९५% एवढाच राहिलाय.

राज्यात पुणे विभागातील लघु मध्यम आणि मोठ्या एकूण ७२० धरणांमध्ये आता केवळ ३२.७०% पाणीसाठा शिल्लक आहे. खडकवासला धरण ५१.१२ टक्क्यांवर भरले असून त्यात सध्या २८.५८ दलघमी उपयुक्त पाण्यासाठी पान २ वर

# संघटन हेच खरे बळ - रावसाहेब दानवे


## जालना ग्रामीण जिल्हा अंतर्गत नविन रचने अंतर्गत १२ मंडळ अध्यक्षाच्या नियुक्त्या

**जालना । प्रतिनिधी -** जालना ग्रामीण जिल्हा अंतर्गत नविन रचने अंतर्गत १२ मंडल अध्यक्ष निवडणूक घोषणा आज दिनांक २० एप्रिल रोजी माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे, आ.संतोष पाटील दानवे, आ.नारायण कुचे, घनसावंगी विधानसभा प्रमुख सतीश घाटगे व जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे यांच्या नेतृत्वाखाली घोषित करण्यात आल्या आहेत उर्वरित तीन मंडल अध्यक्ष निवडणूक घोषणा दिनांक २१ एप्रिल रोजी करण्यात येणार आहेत.

यामध्ये भोकरदन शहर मंडळ अध्यक्ष पदी - श्री. रणवीर देशमुख, पिंपळगाव रेणुकाई - श्री. गणेश भिकाजी इंगळे, सोयगाव देवी - श्री. दिपक जाधव, राजूर - श्री. गजानन सर्जेराव नागवे, जाफ्राबाद - श्री. ज्ञानेश्वर भागिले, टेंभूर्णी- श्री. मनोज शिंदे, बदनापूर - श्री. भगवान मात्रे, अंबड शहर - श्री. सौरभ कुलकर्णी, अंबड ग्रामीण - श्री. प्रदीप पवार, घनसावंगी - श्री. पुरुषोत्तम उढाण, शहागड - श्री. शिवाजी मोरे, जालना ग्रामीण (घनसावंगी) - श्री. संजय बंसीधर आटोळे यांचा समावेश आहे.

यावेळी बोलताना माजी केंद्रीय मंत्री श्री.रावसाहेब पाटील दानवे म्हणाले की, मंडल अध्यक्ष घोषणा करताना समाजातील सर्व स्तरातील घटकांना प्रतिनिधित्व देण्याचा प्रयत्न साधारण पणे करण्यात आला आहे. आज झालेल्या नियुक्त्या ही केवळ आकडेवारी नाही, तर जनाधार आणि जनविश्वासावर आधारित असणारी शक्ती वाढवण्याचा प्रयत्न आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी एका संघटित आणि समर्पित कार्यपद्धतीची ही सुरुवात आहे. आता अधिक गावखेड्यांपर्यंत पोहोचत, सर्वसामान्य मतदाराशी थेट संवाद साधत, भाजपा राज्यामध्ये अंत्योदयाच्या मार्गावर वाटचाल करत आहे. सर्व नवनियुक्त मंडल अध्यक्षांचे पुन्हा एकदा अभिनंदन ! तसेच राष्ट्र प्रथम, त्यानंतर पक्ष आणि शेवटी स्वतः हे सांगणारी भाजपा परिवाराची विचारधारा आपापल्या मंडल परिसरात नव्याने रुजवण्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा !

भारतीय जनता पार्टीच्या संघटन बांधणीला 'संघटन पर्व' अभियानाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात नवे बळ लाभत आहे. या अंतर्गत ९६३ मंडल अध्यक्षांच्या नियुक्त्या पूर्ण झाल्या आहेत. भाजपा महाराष्ट्र प्रदेश



यांच्या वतीने नियुक्त करण्यात आलेल्या सर्व मंडल अध्यक्षांचे हार्दिक अभिनंदन विशेष म्हणजे भाजपा संघटन पर्व अभियानांतर्गत प्राथमिक आणि सक्रीय सदस्य नोंदणीला राज्यभरातून लाभलेला प्रचंड प्रतिसाद लक्षात घेत आता संपूर्ण राज्यभरात एकूण १२२१ मंडल गठीत करण्यात आली आहेत. यातील ९६३ मंडलांची रचना जाहीर करण्यात आली आहे. विशेष म्हणजे या १२२१ मंडलांपैकी २५८ मंडले ही नव्याने स्थापन करण्यात आली आहेत.

## वजरखेडा येथे धार्मिक कार्यक्रमात मंडप उडाला, २० ते २५ जण जखमी

**जालना । प्रतिनिधी -** भोकरदन तालुक्यातील वजरखेडा येथे धार्मिक कार्यक्रमात मंडप उडून भाविकांच्या अंगावर कोसळल्याची घटना घडलीय. जोरदार वाऱ्याने वजरखेडा येथील मंडप उडून भाविकांच्या अंगावर कोसळलाय. या घटनेत सुदैवाने जीवितहानी झाली नसून सुमारे २० ते २५ जण जखमी झालेत. वजरखेडा येथे महारूद्र यज्ञाच्या निमित्ताने शिव महापुराण कथा आयोजित करण्यात आलीय. दुपारच्या पान २ वर

युवा आदर्श

### ट्रीटमेंट ...

व्हीआयपी ट्रीटमेंट
रे जेलमध्ये मिळते
नको त्या जागेवरी
नजर कशी खिळते
देणारे घेणारे खुश
तुमचे काय जळते
रे माणूसकीचेनाते
स्नेह बंधनी जुळते
आता केलेली सेवा
नंतर नक्की फळते
साहेबांची मेहेनजर
आपल्यांकडे वळते
कठीण जागी बदली
अगदी सहज टळते
राखले नाही इमान
कुणा काय कळते
गरीबी भिऊ पळते
ऐश्वर्य पायी लोळते
ऊन्हा छप्पर मिळते
सावली मात्र पोळते
नजरेला नजर देणे
इज्जत जरी टाळते
चूक घडते हातातून
एकांती अश्रू ढाळते

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## अवैधरित्या गोवंशाची वाहतूक करणारे पिकअप वाहन पकडले

### गुन्हा दाखल

**जालना -** अवैधरित्या गोवंशाची वाहतूक करणारे एक पिकअप वाहन बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी पकडून मौजपुरी पोलिसांच्या ताब्यात दिलंय. चह १६ उउ ४५७९ या पांढऱ्या रंगाच्या पिकअप वाहनातून अवैधरित्या गोवंशीय जनावरांची वाहतूक केली जात असल्याची माहिती बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांना मिळाली होती. त्या माहितीवरून बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी सदरील पिकअप वाहन मौजपुरी पोलीस ठाणे हद्दीत पकडून पोलिसांच्या ताब्यात दिलंय. विकास प्रभाकर पगारे (वय ३५ वर्षे) रा.आसोरा ता. अंबड जि.जालना, सिध्दार्थ काकासाहेब होर्शीळ (वय २८ वर्षे) रा.बाजार गेवराई ता.बदनापूर जि. जालना यांच्यावर मौजपुरी पोलीस ठाण्यात पो.हेड का.दादासाहेब पान २ वर






संपादकीय पान

# या जगात कायमचे राहायला कोण आले?

## महाराष्ट्राचा बहुमान

महाराष्ट्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. महाराष्ट्राचे सुपुत्र न्यायमूर्ती भूषण गवई हे लवकरच भारताचे नवे मुख्य सर न्यायाधीश म्हणून शपथ घेतील. भारताच्या महामहीम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मु यांनी त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले असून १४ मे पासून ते भारताचे मुख्य सर न्यायाधीश म्हणून सूत्र हाती घेतील. विद्यमान सर न्यायाधीश संजीव खन्ना यांचा कार्यकाळ १३ मे रोजी संपुष्टात येत आहे. न्यायमूर्ती भूषण गवई हे भारताचे ५२ वे सर न्यायाधीश असतील. याआधी न्या. प्रल्हाद गजेंद्रगडकर, न्या. यशवंत चंद्रचूड, न्या. सॅम भरूचा, न्या. सरोश कपाडिया, न्यान शरद बोबडे, न्या. उदय लळीत, आणि न्या. धनंजय चंद्रचूड या सात मराठी न्यायमूर्तींना हा मान मिळाला आहे. महाराष्ट्राचे सुपुत्र न्यायमूर्ती भूषण गवई यांना भारताच्या महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु या पुढील महिन्यात १४ तारखेला सर न्यायाधीशपदाची शपथ देतील त्यावेळी इतिहास रचला जाईल. भारताचे सर न्यायाधीश म्हणून शपथ घेणारे भूषण गवई हे केवळ दुसरेच दलीत न्यायमूर्ती आहेत याआधी के जी बालकृष्णन पहिले दलीत सर न्यायाधीश बनले होते. न्यायमूर्ती भूषण गवई यांची देशाच्या सर न्यायाधीशपदी नियुक्ती होणे हा महाराष्ट्राचा बहुमान होय कारण ते महाराष्ट्राचे सुपुत्र आहेत. रीपाई नेते व माजी राज्यपाल रा सू गवई यांचे सुपुत्र असलेले न्यायमूर्ती भूषण गवई यांचा जन्म अमरावतीत झाला असून त्यांचे प्राथमिक व कायद्याचे शिक्षण मुंबईत झाले. मुंबईतच त्यांनी वकिली सुरू केली. २००५ मध्ये त्यांची उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून नियुक्ती झाली. वकील आणि न्यायाधीश म्हणून त्यांना दांडगा अनुभव आहे. छत्रपती संभाजीनगर, नागपूर, पणजी येथे त्यांनी न्यायाधीश म्हणून काम केले आहे. २४ मे २०१९ रोजी त्यांची सर्वोच्च न्यायालयात न्यायाधिश म्हणून नियुक्ती झाली. अनेक ऐतिहासिक आणि महत्वपूर्ण निकाल न्यायमूर्ती भूषण गवई यांनी दिले आहेत. नोटबंदी वैध ठरवणारा २०२३ चा निर्णय त्यांच्या कारकिर्दीतील महत्वाचा निर्णय ठरला. जम्मू काश्मीरला विशेष दर्जा देणारे ३७० वे कलम हटवण्याचा निर्णय देणाऱ्या घटना पिठाचा ते भाग होते. प्रशांत भूषण अवमान प्रकरणात निकाल देणाऱ्या खंडपीठाचाही ते भाग होते. कायद्याचे सखोल ज्ञान, सर्वांना सोबत घेऊन जाण्याचे कौशल्य, नेतृत्वगुण, वंचित आणि उपेक्षितांबद्दलचा कळवला या गुणांमुळे ते आधीच लोकप्रिय आहेत. न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या निवडीचा मराठी माणसांना अभिमान आहे. न्यायालय आणि न्यायालयीन कामकाज याविषयी सर्वसामान्य नागरिकांच्या मनात अजूनही काही प्रश्न आहेत. न्यायालयात जलद न्याय मिळत नाही, सर्वसामान्य नागरिकांनी न्यायालयाची पायरी चढूच नये अशी भावना सर्वसामान्य नागरिकांची आहे. सर्वसामान्य नागरिकांची ही भावना खोटी ठरवून जलद न्याय देण्याबरोबरच न्यायव्यवस्थेवरील सर्वसामान्यांचा विश्वास दृढ करण्याची जबाबदारी न्यायमूर्ती भूषण गवई यांच्यावर आहे त्यात ते यशस्वी होतील यात शंका नाही. देशाचे नवे सर न्यायाधीश भूषण गवई यांचे मनापासून अभिनंदन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

### पान १ वरुन

#### राज्यात पाणी ...

आहे. पानशेत धरणात ३४.१०% पाणीसाठा शिल्लक आहे. सांगलीतील वारणा धरण ४०.५६ टक्क्यांवर येऊन पोहोचले आहे. साताऱ्यातील कोयना ३७.२२ टक्क्यांवर आहे. तर सोलापूरमधील उजनी धरण आता शून्यावर पोहोचले आहे. कोल्हापुरातील दूधगंगा २६.४८ टक्क्यांवर असून राधानगरी धरण ५४ टक्क्यांवर आहे.

मराठवाड्यातील जायकवाडी धरणात सध्या ४४.९३% पाणीसाठा शिल्लक आहे. बीड मधील मांजरा धरण ३५ टक्क्यांवर जाऊन पोहोचले आहे तर माजलगाव धरणात २०.४०% पाणीसाठा शिल्लक आहे. हिंगोलीतील सिद्धेश्वर आणि येलदरी धरण ४८.८३% व ५७.५६% अनुक्रमे आहेत. नांदेडच्या विष्णुपुरी धरणात ३३.४२% पाणीसाठा आता शिल्लक आहे. धाराशिव चे सीना कोळेगाव धरण ६.४ टक्क्यांनी भरले आहे तर निम्न तेरणा ५६ टक्क्यांवर आहे. परभणीच्या निम्न दुधनामध्ये ३७.९०% पाणीसाठा शिल्लक आहे.

#### वजरखेडा ...

सुमारास जोरदार वारा सुटला. आणि हा मंडप जोरदार वाऱ्यामुळे उडून भाविकांच्या अंगावर पडला. त्यात सुमारे २० ते २५ जण जखमी झाले असून जखमींना जालना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आलंय. या जखमींवर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू करण्यात आलेत. दरम्यान जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या रुग्णांवर तातडीने उपचार करून त्यापैकी १३ जणांचे सिटीस्कॅन करण्यात आल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे

#### अवैधरित्या गोवंश ...

निवृत्ती हरणे यांच्या फिर्यादीवरून विविध कलमान्वये रात्री ऊशिरा पाऊने तीन वा. गुन्हा दाखल करण्यात आला असून अवैधरित्या वाहतूक केली जाणाऱ्या पाच गोवंशीय जनावरांची बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी सुटका करून जालन्यातील पांजरापोळ या गौशाळेत पाच गोवंशाना सोडण्यात आले.

## तापमानाने नागरिक हैराण

मुंबई - राज्यात सगळ्याच भागात तापमानाने नागरिक हैराण झाले आहेत. उष्णतेचा पारा टोक गाठत असल्याचे चित्र आहे. आज रविवार(२० एप्रिल) रोजी विदर्भ मराठवाडा प्रचंड तापला आहे. बहुतांश ठिकाणी ४०-४५ अंश सेल्सियसच्या नोंदी होत आहेत. (खचऊ) आयएमडीने नोंदवलेल्या कमाल तापमानानुसार, आज राज्याच्या उपराजधानीत नागपुरात तब्बल ४४.७ अंश सेल्सियसची नोंद करण्यात आली आहे. हे राज्यातील सर्वाधिक तापमान आहे. अकोल्याचा पारा ४४.३ अंश सेल्सियसवर आहे तर संपूर्ण विदर्भाचे तापमान ४० अंश सेल्सियसच्या पुढे आहे. मराठवाडाही चांगलाच तापला असून परभणीत ४३.६ अंश तर बीड ४२ अंशांवर स्थिरावले आहे. संपूर्ण कोकणपट्ट्यात तसेच मुंबई व मुंबई उपनगरात प्रचंड उकाडा जाणवतोय. उन्हाचा चटका असह्य झाला आहे.

---

एखाद्याच्या अंत्यविधीला गेल्यावर मयत व्यक्तीच्या घरातील सदस्य, नातेवाईक व जवळचा मित्रपरिवार दुःखी व कष्टी होऊन ढसाढसा रडताना पाहिल्यावर काही जणांचे मन हळवे होऊन नकळत त्यांच्याही डोळ्यातून अश्रूंच्या धारा वाहू लागतात. जवळचा व्यक्ती अनंतात विलीन झाल्याचे दुःख त्यांच्याही मनाला खूप वेदना देऊन जाते. तर काही जणांना आपला जवळचा प्रिय व्यक्ती गमावल्याचे खूप दुःख होऊनही, मनाला भावनिक वेदना होऊनही, त्यांच्या डोळ्यातून अश्रूंचा एक थेंब देखील निघत नाही. कारण दुःख पचवायला त्यांचे मनच तेवढे खंबीर व मजबूत असते. आणि त्यांचे हृदय कठोर आणि निष्ठुर असते. म्हणून त्यांचे मन लवकर हळवे व भावनिक होत नाही. म्हणून त्यांना लवकर रडू येत नाही. पण त्यांना देखील जवळचा व्यक्ती गेल्याचे मनोमन खूप दुःख होते म्हणून ते एकांतात जाऊन आपले मन हलके करतात. त्यांचाही कंठ दाटून येतो. मनात विचारांचे काहूर उठते. पण ते लोकांना दाखवून देत नाहीत. तर ते न डगमगता त्या दुःखाला सामोरे जाऊन आलेल्या संकटावर हिंमतीने मात करतात. आणि ज्यांना अश्रू अनावर होत नाहीत त्यांना देखील धीर देण्याचे काम करतात. त्यांच्या मनाचे सांत्वन करतात. या जगात राहायला कोण आले आहे? आपल्यालाही एक ना एक दिवस मरायचेच आहे, असे लोकांना तळमळीने सांगतात.पण लोकांना असे वाटते की, हा व्यक्ती किती अमानुष व निर्दयी आहे. यांच्या घरातील जवळचा व्यक्ती मरूनही त्यांच्या डोळ्यातून अश्रूचा एकही थेंब निघत नाही. म्हणजे या व्यक्तींना त्या मयत व्यक्तीबद्दल त्यांच्या मनात जराही दयाभाव व आदरभाव नाही. असे अंत्यविधीला जमलेल्या लोकांना मनोमन वाटते. पण त्यांना कोण सांगणार? की, हा व्यक्ती आतून व मनातून किती खचला आहे ते. कारण दिसतंय तसं नसतंय म्हणूनच हे जग फसतंय हे काय उगीच म्हटले नाही. जे रडतात ते आतून खचत नाहीत पण जे खरोखरच आतून खचतात ते रडत नाहीत. ही वस्तुस्थिती आहे. कारण हे लोक खूप विचारवंत असतात त्यांना माहीत असते की, पोकळ रडून हंबरडा फोडल्याने काहीच फायदा होत नसतो. आपल्यालाही एकदिवस या जीवनातून मुक्त व्हायचेच आहे. मग माणूस गेल्यावर रडायचे कशाला? उलट रडणाऱ्यांना धीर देणे महत्त्वाचे असते. हे काम अगोदर केले पाहिजे. नाहीतर आपणही रडायला लागलो तर आपले बघून दुसरेही लोक रडायला लागतील. म्हणून न रडता आलेल्या दुःखाला पचवणे फार महत्त्वाचे असते.

होय हे अगदी खरे आहे की, या जगात कायमस्वरूपी राहायला कोणीच आले नाही. या पृथ्वीतलावर जन्माला आलेला प्रत्येक माणूस एक ना एक दिवस तरी मरणारच आहे. हे निश्चित आहे. म्हणून माणूस मेल्यावर मनाला तेवढे दुःख व मनस्ताप करून घेण्याची काहीही गरज नाही. मान्य आहे की, जवळचा प्रिय व्यक्ती गेल्यावर आपल्या मनाला खूप दुःख व वेदना होतात. आपले मन हळहळते. नकळत आपल्या डोळ्यातून पाणी येऊ लागते. आणि ते डोळ्यातून आलेले पाणी त्या मयत व्यक्तीबद्दल आपल्या मनात असलेली माया, प्रेम व आपुलकी व्यक्त करते.

पण आजकाल अंत्यविधीला गेल्यावर एक वेगळेच चित्र पाहायला मिळत आहे. मयत व्यक्तीच्या घरातील काही सदस्य जे की, त्या मयत व्यक्तीला कधीचं नीट न बोलणारे, त्याला अमानुषपणे वागणूक देणारे, अंत्यविधीत मोठमोठ्याने ढसाढसा रडतात. हंबरडा फोडतात. आणि आपले वरपांगी पोकळ प्रेम व माया लोकांना दाखवून देतात. जोरजोराने रडून लोकांना प्रदर्शन दाखवतात. अंत्यविधीला जमलेल्या लोकांचे लक्ष त्यांच्याकडे आकर्षित करतात. असल्या पोकळ व वरपांगी रडण्याला काय अर्थ? तुमचा नौटंकीपणा लोकांच्या लक्षात येतो. पण ते बोलून दाखवत नाहीत. असल्या नौटंकी लोकांचा मला खूप राग व किटकारा येतो. पण करायचे काय? कारण जिवंतपणी आई-वडिलांना, भावांना व जवळच्या नातेवाईकांना ढुंकूनही न विचारणारे व प्रेमाचे चार शब्द कधीही न बोलणारे लोक ते मेल्यावर मात्र पुळक्याने रडायला सगळ्यात पुढे असतात आणि मोठमोठ्याने रडून त्या मयत व्यक्तीबद्दल आपल्या मनात किती प्रेम व माया ठासून भरली आहे, हे लोकांना दाखवून देतात. पण अशा लोकांना ना कसली खंत ना कोणत्या भावना. पण खरोखरच ज्यांच्या मनात त्या मयत व्यक्तीबद्दल प्रेम, माया व आपुलकी असते. त्या व्यक्ती कधीच लोकांना रडून दाखवत नाहीत. ना कोणता दिखावा करत नाहीत. त्यांचाही कंठ दाटून येतो. उर भरून येतो. मनातील भावना उफाळून येतात. पण ते त्या भावनांचा उद्रेक कधीच होऊ देत नाहीत. एवढे कंट्रोल त्यांचे त्यांच्या मनावर असते.पण आजकाल आई-वडिलांना जिवंतपणी न सांभाळणारे, त्यांना घराबाहेर हाकलून देणारे, त्यांना दररोज टोमणे मारणारे, वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवणारे आणि पत्नीचे ऐकून आई-वडिलांना अंतर देणारे काही महाभाग आईवडील मेल्यावर मात्र पुळक्याने रडतात. मी आई-वडिलांसाठी हे केलं, ते केलं असे मोठमोठ्याने सांगतात. आणि हंबरडा फोडतात. अशा नौटंकी लोकांना आईवडील मेल्याचे जराही दुःख होत नाही. उलट त्यांना मनोमन आनंद होतो. पण ते लोकांना दाखवून देत नाहीत. फक्त वरपांगी रडून आई-वडिलांप्रती माझ्या मनात किती माय व आदर आहे, असे लोकांच्या निदर्शनास आणून देतात. आणि तेरवी होण्याच्या अगोदरच शेताची, घराची व संपत्तीची वाटणी करायला गावातील चार माणसे बोलावतात. आणि आपापली जमीन वाटून घेतात. कधी कधी शेतीच्या वाटणीवरून भावाभावांत वाद-विवाद निर्माण होतात. आणि ते वादविवाद विकोपाला जाऊन शेवटी कोर्ट कचेरीची पायरी चढतात. अशा स्वार्थी लोकांना मला सांगावे वाटते की, मित्रांनो या जगात कायमचे राहायला कोणीच आले नाही. आपण आज आहोत तर उद्या नाही. कारण मानवी जीवन हा पाण्यावरचा बुडबुडा आहे. तो कधी फुटेल याचा काही नेम नसतो. म्हणून पैसा पैसा करत बसण्यापेक्षा जिवाभावाची चार माणसे जोडायचे बघा. आपण या पृथ्वीतलावर रिकाम्या हाताने आलोय आणि रिकाम्या हातानेच जाणार आहोत... एकदिवस पैसा, संपत्ती व धनदौलत हे सर्व मागेच सोडून जावे लागणार.



म्हणून आपल्या कितीही जवळचा माणूस मेला तर रडत बसण्यापेक्षा, हळहळ व्यक्त करण्यापेक्षा मनाने खंबीर बनून धीर धरायला शिका. रडणाऱ्या व्यक्तींना देखील सांगा की, आपणही एकदिवस जगाचा कायमचा निरोप घेणार आहोत. जगाला अलविदा करून कायमचे निघून जाणार आहोत. कारण जन्मानंतर मृत्यू हा प्रत्येकाचा ठरलेलाच असतो. तो निसर्गाचा नियमच आहे. कारण एक मेला तर दुसरा जीव प्राप्त होईल. म्हणून हे जीवन क्षणभंगुर आहे. त्यासाठी या जीवनाचा पुरेपूर आनंद घ्यायला शिका. सगळ्यांसोबत प्रेमाने व आपुलकीने राहायला शिका... कारण या जगात कायमचे राहायला कोणीच आले नाही. मेल्यावर देखील आपल्या नावाचा जयजयकार व गवगवा होईल असे काहीतरी अलौकिक कार्य करून जगाला दाखवा.

चंद्रकांत कांबळे
मु.पो.खंडाळी, ता.अहमदपूर जिल्हा लातूर
मो.७४९८७१५६६१

---

भाजपच्या तालुका अध्यक्षांची निवड; घनसावंगी विधानसभेत भाजपला मिळाले नवे नेतृत्व

# पुरुषोत्तम उढाण यांना घनसावंगी, तर अंबडची जबाबदारी शिवाजी मोरेंकडे

**घनसावंगी । प्रतिनिधी** - भारतीय जनता पक्षाच्या संघटन पर्वअतंर्गत माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली घनसावंगी विधानसभेतील मंडळांना नवे नेतृत्व लाभले आहे. घनसावंगी, शहागड (अंबड) आणि रांजणी (जालना ग्रामीण-२) या तालुक्यांसाठी नव्या अध्यक्षांची निवड घनसावंगी येथे रविवारी करण्यात आली. घनसावंगी तालुका अध्यक्षपदी पुरुषोत्तम उढाण, शहागड (अंबड) तालुका अध्यक्षपदी शिवाजी नाना मोरे, तर रांजणी (जालना ग्रामीण-२) तालुका अध्यक्षपदी श्री. संजय आटोळे यांची निवड करण्यात आली.

१ जानेवारी २०२५ पासून महाराष्ट्रात भारतीय जनता पार्टीचे 'संघठण पर्व' अर्थात नवीन सदस्यता अभियान सुरु केले होते. त्या अंतर्गत महाराष्ट्रात भारतीय जनता पार्टीचे विक्रंमी १.५० कोटी प्राथमिक सदस्य तर १ लाख ३४ हजार सक्रिय सदस्य पुर्ण झाले. भारतीय जनता पार्टीने कामाच्या सोयीनुसार घनसावंगी विधानसभेत ३ मंडळाची निर्मिती केली. या तिन्ही मंडळातून मंडळ अध्यक्ष पदासाठी प्रत्येक मंडळातून इच्छुकांची चाचपणी करुन जिल्हयातील नेतृत्वाच्या शिफारशीनुसार प्रदेशाध्यक्ष यांच्या सोबत चर्चा करुन घनसावंगीच्या मंडळ अध्यक्ष पदाची घोषणा रविवारी पक्षाने नियुक्त केलेल्या निवडणूक निरीक्षकांच्या उपस्थितीत केली. घनसावंगी तालुका अध्यक्षपदी पुरुषोत्तम उढाण, शहागड (अंबड) तालुका अध्यक्षपदी शिवाजी नाना मोरे, तर रांजणी (जालना ग्रामीण-२) तालुका अध्यक्षपदी संजय आटोळे यांची निवड करण्यात आली. या नूतन अध्यक्षांचे भाजपा जिल्हा प्रमुख बद्रीनाथ पठाडे, जिल्हा सरचिटणीस सिद्धीविनायक मुळे आणि सभापती श्री. अवधूत नाना खडके व भाजपा नेते सतीश घाटगे यांनी नियुक्तीपत्र देऊन अभिनंदन केले.

पक्षश्रेष्ठींनी नव्या नेतृत्वाला संधी दिल्याबद्दल सतीश घाटगे यांनी उपस्थित नेत्यांचे आभार मानले. या निवडीमुळे पक्षाला अधिक उंचीवर नेण्यास मदत होईल, तसेच नव्या नेतृत्वाच्या साथीने घनसावंगी विधानसभेत विकास आणि प्रगतीचा नवा अध्याय सुरू होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या निवडी प्रसंगी ज्येष्ठ नेते बाबुराव खरात, माजी तालुका अध्यक्ष शिवाजीराव बोबडे, महिला संघटक अर्चनाताई सोसे, माजी जिल्हाध्यक्ष रामेश्वर भांदर्गे, माजी सभापती नामदेव ढाकणे, माजी जि.प.




सदस्य जीवनराव वगरे, भटके विमुक्त आघाडी प्रदेश उपाध्यक्ष डॉ. रमेश तारगे, ज्येष्ठ नेते अनिरुद्ध झिंजुर्डे, भगवान बर्वे, रामेश्वर माने, अरुण घुगे,चंद्रकांत बांगर, पांडुरंग खटके, ज्ञानेश्वर डोईफोडे, केदार राठी, पंकज रक्ताटे, विलास होंडे, प्रेमानंद उढाण आदी उपस्थित होते.

---

# डॉ. शिवा राजकुमार, उपेंद्र अभिनीत साऊथच्या ॲक्शन चित्रपट '४५' चा जबरदस्त टीझर लाँच

दक्षिण चित्रपटसृष्टीच्या संपूर्ण भारतात प्रदर्शित होण्याच्या या सुवर्णकाळात, दिग्गज कन्नड चित्रपट अभिनेते डॉ. शिवा राजकुमार, उपेंद्र आणि राज बी. शेट्टी आणि इतर अभिनीत बहुप्रतिक्षित कन्नड भाषेतील ॲक्शन पॅक्ड फॅन्टसी ड्रामा चित्रपट '४५' आज मुंबईतील पीव्हीआर सिनेमाजमध्ये लाँच करण्यात आला. देशातील चार मोठ्या शहरांमध्ये प्रमोशनसाठी संपूर्ण भारत दौरा मोठ्या उत्साहात सुरू झाला आहे. काय टीझर आहे! हा टीझर प्रेक्षकांना चित्रपट पाहण्यासाठी आमंत्रित करत आहे. प्रसिद्ध संगीत दिग्दर्शक अर्जुन जान्या यांनी मोठ्या दक्षिणेतील कलाकारांना एकत्र आणण्याचा प्रयोग केला आहे आणि दिग्दर्शक म्हणून हा त्यांचा पहिलाच चित्रपट आहे. सूरज प्रॉडक्शन निर्मित हा चित्रपट १५ ऑगस्ट २०२५ रोजी हिंदीसह कन्नड, तमिळ, तेलुगू आणि मल्याळम भाषेतही प्रदर्शित होणार आहे. मल्टी-स्टारर चित्रपटांसाठी एक मानक स्थापित करणाऱ्या ४५ चित्रपटाच्या अनोख्या प्रमोशनल योजनेचा एक भाग म्हणून, निर्मात्यांनी १५ आणि १६ एप्रिल २०२५ रोजी मुंबईत हिंदी टीझरच्या भव्य शोसह चार राज्यांचा एक शानदार टीझर लाँच टूर सुरू केला आहे. चित्रपटाच्या टीझरचे प्रमोशन फक्त २ दिवसांत चार राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात केले जाईल. मुंबईनंतर, १५ एप्रिल रोजी संध्याकाळी हैदराबादमध्ये उत्सव साजरा केला जाईल. दुसऱ्या दिवशी १६ एप्रिल रोजी, चित्रपटाची टीम चेन्नईला रवाना होईल आणि नंतर शेवटी केरळमधील कोची येथील पीव्हीआर फोरम येथे एका भव्य कार्यक्रमाने समारोप होईल.

चित्रपटाचे ज्येष्ठ अभिनेते डॉ. शिवराजकुमार म्हणतातः '४५' हा एक अतिशय रोमांचक सिनेमा आहे. जेव्हा मी त्याची कथा वाचली तेव्हा मला वाटले की हा एक असाधारण चित्रपट असेल आणि मी लगेचच या चित्रपटात काम करण्यास होकार दिला. टीझर लाँच हा आमचा उत्साह आमच्या चाहत्यांसोबत शेअर करण्यासाठीचा पहिला टप्पा आहे. या चित्रपटाशी आपल्या सर्वांच्या भावना जोडल्या गेल्या आहेत. दिग्दर्शक अर्जुन जान्या पुढे म्हणाले की, लॉकडाऊन दरम्यान मला ही कहाणी आठवली. त्या कोरोना काळात माझा भाऊ वारला. त्यातून प्रेरणा घेऊन मी कथा लिहिली. संगीतकार म्हणून १५० चित्रपट केल्यानंतर जेव्हा मी चित्रपट दिग्दर्शक झालो, तेव्हा सर्वांना वाटले होते की हा एक संगीतमय चित्रपट असेल, पण ४५ चित्रपटाची कथा अशी आहे की त्यात एकही गाणे नाही. हो, त्यासाठी एक प्रमोशनल गाणे असेल. निर्माते एम. रमेश रेड्डी म्हणतातः ४५' हा आपल्या सर्वांसाठी एक स्वप्नवत प्रकल्प आहे. आम्ही नेहमीच हा चित्रपट वेगवेगळ्या भाषा आणि प्रदेशातील प्रेक्षकांना आवडेल असा चित्रपट म्हणून पाहिला आहे. हा टीझर टूर फक्त सुरुवात आहे. ट्रेलर आणि गाण्यांपासून ते पडद्यामागील खास कार्यक्रम आणि चाहत्यांच्या कार्यक्रमांपर्यंत - आम्ही सर्वत्र लोकांशी जोडण्याचा प्रयत्न करू. हा १०० टक्के भारतीय चित्रपट आहे. तुम्ही टीझरमध्ये फक्त २५ टक्के पाहिले आहे, ७५ टक्के अजून दिसणे बाकी आहे जे चित्रात दिसेल. दिग्दर्शक पुढे म्हणाले की, शिवा राजकुमार आणि उपेंद्र यांनी चित्रपटात काही धक्कादायक दृश्ये साकारली आहेत. टीझरच्या शेवटी उपेंद्रजींचा कुत्र्यासोबतचा एक शॉट आहे जो त्यांनी काहीही न विचारता केला. श्रीमती निर्मित. उमा रमेश रेड्डी आणि एम. रमेश रेड्डी निर्मित आणि सूरज प्रॉडक्शनच्या बॅनरखाली अर्जुन जान्या लिखित आणि दिग्दर्शित '४५' हा चित्रपट १५ ऑगस्ट २०२५ रोजी स्वातंत्र्यदिनी प्रदर्शित होणार आहे.

---

### वाचकांचे मनोगत

# हिंदीचे मराठीवर आक्रमक, मराठी भाषा महाराष्ट्रात सक्तीची कधी होणार?

महाराष्ट्रात इयत्ता पहिली पासून इयत्ता पाचवी पर्यंत हिंदी भाषा सरकारने अनिवार्य केली असल्याचे बातमीपत्रातून समजले.महाराष्ट्रातील राजभाषा मराठी काही महिन्यांपूर्वीच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला.कवी, लेखक, नाटककार, जेष्ठ साहित्यिक वंदनीय वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जन्म दिवस 'मराठी भाषा दिन' म्हणून शासकीय पातळीवर साजरा करण्यात येतो.आधीच महाराष्ट्रात परप्रांतीयांकडून मराठी माणसाचा ,मराठी भाषेचा कोंडमारा झाला आहे.त्यात आता, सरकारनेच हिंदी भाषा अनिवार्य केली त्याबद्दल महाराष्ट्रात चर्चेला उधाण आले आहे.भारतातील अनेक राज्यातील लोक मुंबई- महाराष्ट्रात राहतात. त्यामुळेच परप्रांतीयांची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढते आहे.सरकारनेच हिंदी भाषा अनिवार्य केली. म्हणून हिंदी शिक्षकांना रोजगार उपलब्ध होणार, येणारे आपल्या कुटुंबकबिल्यासह येणार महाराष्ट्राची लोकसंख्या वाढणार,महाराष्ट्रातील मतदार वाढणार, महाराष्ट्रातील परप्रांतीय लोकप्रतिनिधी वाढणार आता पर्यंत मुंबई महापालिकेतील२२७ नगरसेवकांपैकी ८५ परप्रांतीय नगरसेवक होते.येणार्या निवडणूकीत हा आकडा तीन अंकी असू शकतो हे मराठी माणसांने लक्षात घेतले पाहिजे.विविध पक्ष परप्रांतीय उमेदवार देण्यात धन्यता मानतात कारण ते अमाप पैसा खर्च करून निवडुन येणार .महापौर , वैधानिक समित्यांचे, विशेष समित्यांचे अध्यक्ष परप्रांतीय होणार यात दुमत नाही.महाराष्ट्रातील सरकार मराठी भाषा सक्तिची का करीत नाही.दक्षिणेकडील राज्ये ,तेथील जनता हिंदी भाषेला टोकाचा विरोध करीत आहेत.तामिळनाडूच्या सरकारनेच ठाम विरोध केला आहे. दक्षिणेकडील जनता आपली मातृभाषेवर जीवापाड प्रेम करतात. त्यांनी पुढचे धोके ओळखले आहेत. महाराष्ट्रात मराठी माणूस राजकीय पक्षांत विभागला गेला. महाराष्ट्राची अस्मिता ,स्वाभिमान भूतकाळात जाऊ न देता वर्तमान काळात तो पुढे आणावा म्हणून वंदनीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी सातत्याने प्रयत्न केले . पण,त्यांच्या निधनानंतर त्यांची स्वप्ने तिथेच थांबली.मराठी माणूस आणि शिवसेना एकाच रेषाखंडाची दोन टोके आहेत. उद्धव ठाकरें - राज ठाकरेंवर मराठी माणसाची,महाराष्ट्राची मोठी जबाबदारी आहे काळाची पावले ओळखून मतभेद विसरून एकत्र येऊन महाराष्ट्र घडवावा अशीच महाराष्ट्रातील तमाम जनतेची अनेक वर्षाची इच्छा आहे.

**महादेव गोळवसकर, कुर्ला मुंबई**
९८६९४७६२०९,
mahadeogolvaskargmail.com

## रामधाम येथे आदर्श सर्वधर्मीय विवाह सोहळ्यात २५ जोडप्यांचे शुभमंगल

**पुणे -** जबलपूर महामार्गावरील असलेल्या मनसर येथील प्रख्यात रामधाम येथे शुक्रवार दिनांक १८ एप्रिल २०२५ ला चंद्रपाल चौकसे लोकसेवा प्रतिष्ठान रामधाम, मनसर तथा आधार बहुउद्देशीय संस्था, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, एकात्मिक आदिवासी प्रकल्प महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने आदर्श सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळा थाटात पार पडला.यावेळी तब्बल २५ जोडप्यांचे शुभमंगल झाले. विशेष म्हणजे रामधाम येथे गेल्या अनेक वर्षांपासून पार पडलेल्या आदर्श सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्यात आजपर्यंत १३३९ जोडप्यांचे शुभमंगल निःशुल्क संपन्न झालेले आहे आणि यंदा त्यात २५ जोडप्यांची भर पडली.ज्यांची लग्न करायची सोय नाही अशा अनेक जोडप्यांचे येथे पर्यटकमित्र चंद्रपाल चौकसे रामधाम येथे निःशुल्क विवाह आटवून देतात. यावेळी वधूवरांना आशीर्वाद देण्यासाठी राज्यमंत्री आशीष जयस्वाल, डी.मल्लिकार्जुन रेड्डी, चंद्रपाल चौकसे, संध्या चौकसे, सतीश डोंगरे, गौरव चौकसे, डीवायएसपी रमेश बरकते, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.





**समस्त तेली समाज जालना यांच्या वतीने आयोजित अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व राम कथा ज्ञान यज्ञ सोहळा मोदीखाना तेली पंचायत वाडा येथे विधीशास्त्र संपन्न ह भ प यशोधन महाराज साखरे आळंदी देवाची यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता झाली. यावेळी माजी राज्यमंत्री व आमदार अर्जुनरावजी खोतकर, पंडित भुतेकर, ह भ प बाबुराव व्यवहारे, ह भ प लक्ष्मणराव क्षीरसागर, ह भ प प्रभाकर महाराज सुरासे, ह भ प योगीराज महाराज लोखंडे, नानासाहेब वाघचौरे, विष्णू वाघमारे, नरेश खुदभैय्ये, रंगनाथ राऊत, सुधाकर क्षीरसागर, मनोज धुपे यांच्यासह मोठ्या संख्येने भाविक समाज बांधव उपस्थित होते.** (छाया - अनिल व्यवहारे)

## घंटागाड्यावरील हिंदी गाण्यांना मनसेचा आक्षेप

### मनसेचे शहराध्यक्ष राहुल रत्नपारखे यांची प्रतिक्रिया

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील महानगरपालिका हद्दीमध्ये चालणाऱ्या घंटा गाड्यांवर कचरा गोळा करण्यासाठी हिंदी गाणे लावण्यात येत आहे परंतु महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आता या हिंदी गाण्यांवर आक्षेप घेतला असून यापुढे घंटागाड्यांवर मराठी मधून गाणे लावण्यात यावे नसता महानगरपालिके विरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा मनसेचे शहराध्यक्ष राहुल रत्नपारखे यांनी आज दि.२० रविवार रोजी दुपारी बारा वा. च्या सुमारास पालिका परिसरात दिला आहे. माध्यमांशी संवाद साधत असताना ते म्हणाले की,जालना शहर हे मराठी बहुभाषिक आहे प्रत्येक घरामध्ये मराठी भाषा कळते त्यामुळे हिंदी भाषा का म्हणून जबरदस्ती लादण्यात येत आहे असा सवाल रत्नपारखी यांनी उपस्थित केला. सध्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने महाराष्ट्रभर मराठी भाषेला प्रोत्साहन देण्यासाठी वेगवेगळ्या उपक्रमामार्फत कार्यक्रम राबविण्यात येत आहे त्या अनुषंगाने जालना



शहरात कचरा गोळा करणाऱ्या घंटागाड्यांवर आता इथून पुढे मराठी भाषेचे गाणे ऐकावयास मिळाले पाहिजे असा इशाराही देण्यात आला.

## मुख्याध्यापक शामराव जगताप, शिक्षण विस्तार अधिकारी सुनील घुमरे यांचा सेवापूर्वी समारंभ

**दौंड -** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कानगाव ( तालुका दौंड ) शाळेचे मुख्याध्यापक शामराव जगतात तसेच दौंड पंचायत समितीचे शिक्षण विस्तार अधिकारी सुनील घुमरे साहेब हे नियत वयोमानानुसार सेवेतून निवृत्त होत असल्याने कानगाव शाळेतील विद्यार्थी व शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समिती तसेच कानगावातील ग्रामस्थ व पालकांच्या वतीने त्यांचा सेवापूर्ती समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी शामराव जगताप व सुनील घुमरे यांचे नातेवाईक, मित्रपरिवार, शिक्षकवृंद तसेच मित्र परिवार मोठ्या संख्येने त्यांना शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित होते. यावेळी श्री शामराव जगताप व श्री सुनील घुमरे यांच्या अनेक सहकाऱ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत विचारातून आणि कविता, गाणी गाऊन त्यांना भेटवस्तू आणि सन्मानचिन्ह देऊन शुभेच्छा दिल्या. यावेळी शाळेतील ४ थी च्या विद्यार्थ्यांनाही निरोप देण्यात आला. ४ थी च्या विद्यार्थ्यांनी शाळेला ऑफिस खुर्ची भेट दिली. दिनांक १७ एप्रिल रोजी कानगाव शाळेच्या मैदानात त्यांचा सेवापूर्ती समारंभ आयोजित करण्यात आला.

### नेत्र तपासणी व मोतीबिंदू निदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

## २४७ रुग्णांची तपासणी ९० रुग्णांना मोतीबिंदू निदान

**धाकलगांव । प्रतिनिधी -** अंबड तालुक्यातील वडिगोद्री येथे शांताई सामाजिक युवा प्रतिष्ठान व गणपती नेत्रालय जालना यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू निदान शिबिर घेण्यात आले आहे या शिबिरात २४७ रूग्णांची तपासणी करण्यात आली व ९० रूग्णांचे मोतीबिंदू निदान या शिबिरात झाले.

शिबिराचे उद्धाटन समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाडगे यांच्या हस्ते झाले त्याप्रसंगी ते म्हणाले की सध्या आरोग्य सेवा ही ईश्वरसेवा आहे आरोग्य सेवा ही महाग झाली असताना सामान्य जनतेला तिचा लाभ घेणे कठीण झाले आहे अशा परिस्थितीत मोफत शिबिर हे गरजूंसाठी आशेचे किरण ठरतात विशेषता ज्येष्ठ नागरिकांसाठी महत्त्वाची भूमिका बजावतात यावेळी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये बोलताना शांताई सामाजिक युवा प्रतिष्ठान चे अध्यक्ष राजेंद्र छल्लारे सर म्हणाले की या शिबिराचा मुख्य उद्देश म्हणजे आपल्याला समाजाचे काहीतरी देणे लागते त्या साठी परतफेड म्हणून अशी शिबिराचे आयोजन आपण करीत असतो या शिबिरासाठी शांताई युवा प्रतिष्ठान संपुर्ण किमी व पंचक्रोशीतील सर्व जनतेने परिश्रम घेतले.




# विकास कामे शहरातील प्रत्येक घटकापर्यंत पोहचवा - भास्कर दानवे

## भाजपा जालना महानगर मंडळात सुनील खरे, संजय डोंगरे, महेश निकम, अमोल धानुरे यांचा समावेश

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जनता पार्टी जालना महानगर जिल्हा अंतर्गत चार मंडळाच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या असून यात महानगर ग्रामीण मंडळ अध्यक्ष पदी संजय डोंगरे, नवीन जालना मंडळ अध्यक्ष सुनील खरे, जुना जालना मंडळ अध्यक्ष महेश निकम, पूर्व जालना मंडळ अध्यक्ष अमोल धानुरे यांचा समावेश आहे.

माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या सूचनेनुसार भाजपा जिल्हा कार्यालयात रविवारी (ता.२०) जालना विधानसभा प्रमुख भास्करराव पाटील दानवे यांच्या हस्ते नवनियुक्त मंडळ अध्यक्षांना नियुक्ती पत्रे देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी प्रदेश निमंत्रित सदस्य विजय कामड, ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष सोपान पेंढारकर, महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा सौ.संध्याताई देठे, महानगर अध्यक्ष सतीश जाधव, अर्जुन



गेही, डॉ.श्रीमंत मिसाळ, प्रा.राजेंद्र भोसले, वसंतराव शिंदे, सौ.अरुणाताई जाधव, विष्णू डोंगरे आदींची उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना श्री.भास्करराव पाटील दानवे यांनी केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा जास्तीत जास्त फायदा शहरातील नागरिकांपर्यंत पोहचवून आपल्या मंडळात पक्ष संघटन बळकट करावे असे आवाहन त्यांनी केले.

महानगर अध्यक्ष सतीश जाधव यांनी भारतीय जनता पार्टीचे काम जालना शहरातील प्रत्येक वार्डात पोहोचवून जालना महानगरपालिकेवर भाजपा महायुतीचा झेंडा फडकविण्यासाठी कसोशीने प्रयत्न करावेत असे आवाहन केले. सूत्रसंचालन प्रा.राजेंद्र भोसले यांनी केले तर वसंत शिंदे यांनी आभार मानले. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. दरम्यान निवडीची घोषणा होताच पक्ष कार्यालयासमोर कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिषबाजी करत नवीन मंडळ अध्यक्ष निवडीचा जल्लोष साजरा केला.

# उदयसिंह बोराडे यांच्या प्रयत्नातून मंजूर सिमेंट रोडचे उदघाटन



**मंठा । प्रतिनिधी -** शहरातील नगरपंचायतच्या वार्ड क्रमांक १५ मधील शिवसेना तालुकाप्रमुख उदयसिंह प्रल्हादराव बोराडे यांच्या प्रयत्नातून मंजूर झालेल्या २० लक्ष रुपयांच्या सिमेंट रोड चे उद्घाटन शिवसेना जिल्हाप्रमुख ए.जे. बोराडे यांच्या हस्ते रविवार (दि.२० रोजी) करण्यात आले.वॉर्डातील नागरिकांना वेळोवेळी चांगल्या सुविधा मिळवून देण्यासाठी आम्ही नेहमीच कटिबध्द असतो.

अनेक दिवसांपासून नागरीकांची ह्या रस्त्याची मागणी होती आज ती पूर्ण झाली याचा आनंद आहे असे तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे आणि नगरसेविका सरोजाताई प्रल्हादराव बोराडे यांनी यावेळी सांगितले.यावेळी शिवसेना नेते माजी सभापती प्रल्हादराव बोराडे, संचालक संतोषराव वरकड, तुलसीराम कुहिरे, योगेश गणगे, बाळासाहेब देशमुख, ड. राजेश खरात, दिनकर निर्वळ, पप्पू दायमा, विनोद खरात, अमोल राठोड, बाळकृष्ण जोशी, विलास उन्हाळे, नितीन सोळंके, जनार्दन काकडे, प्राचार्य खरात सर, माने साहेब परिसरातील नागरिक व शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते.

# वरातीमध्ये डीजे वर नाचण्यावरून भांडण; एका मुलाने घेतला गळफास!

**जालना । प्रतिनिधी -** एका लग्नाच्या वरातीमध्ये डीजे वर नाचण्यावरून मित्रांमध्ये वाद झाला. यानंतर एका सोळा वर्षांच्या मुलाने गळफास घेऊन आत्महत्या केली. रोहन राहुल साळवे असे मयत मुलाचे नाव आहे. ही घटना जालना शहरातील चंदनझिरा येथे शुक्रवार १८ एप्रिल रोजी मध्य रात्रीच्या सुमारास घडली.

याबाबत चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सम्राटसिंह राजपूत यांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास चंदनझिरा भागात एका लग्नाची वरात निघाली आणि वरातीमध्ये मित्रामित्रांची भांडणे झाली. यामध्ये रोहन साळवे होता. त्याच्या वडिलांनी त्याला घरी नेले. त्या पाठोपाठच रोहनचे मित्र देखील हातात काही शस्त्र घेऊन रोहनच्या घरासमोर आले. दरम्यान, घरासमोर त्यांच्यातील भांडणे मिटविण्यात आले. त्यानंतर रात्री उशिरा रोहन साळवे याने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. रात्री दीड वाजता रोहन साळवे याला त्याच्या घरच्यांनी उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात भरती केले. परंतु तिथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले .याप्रकरणी चंदनझिरा पोलीस ठाण्यामध्ये अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. दरम्यान शविच्छेदन केल्यानंतर शनिवारी अकरावाजेच्या सुमारास रोहनचा मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.

# शिवसेना दलित आघाडीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर आज विराट जनआक्रोश मोर्चा

## जिल्हाभरातील भुमिहिन, बेघर, कास्तकर सहभागी होणार

**जालना । प्रतिनिधी -** शिवसेना दलित आघाडीच्या वतीने भुमिहिन बेघर, जिल्हा स्तरावर सौरऊर्जेचा प्रकल्प दलित आदिवासी कास्त पट्टे न्याय प्रविष्ट असतांना बळजबरी ताब्यात घेत असल्याचे प्रशासनाच्या विरोधात तसेच जेनपुर (कोठारा) येथील जालना वरिष्ठ न्यायालयात न्यायप्रविष्ट असताना भोकरदन पोलिस ठाण्यामार्फत ताबा करुन भुमिहिनांचा घरे पाडून निर्वासित केले आहे. त्या विरोधात शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख ॲड. भास्करराव मगरे यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवार २१ एप्रिल रोजी सकाळी ११.३० वाजता अति विराट जनआक्रोश मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहे. दलित आदिवासी भूमिहीन बेघर निराधार यांच्या न्याय हक्कासाठी व तसेच जिल्हा स्तरावर सौऊर्जेचा प्रकल्प दलित आदिवासी कास्त पट्टे न्याय प्रविष्ट



असताना बळजबरी ताब्यात घेत असल्याचे प्रशासनाचे विरोधात तसेच जेनपुर (कोठारा) येथील जालना वरिष्ठ न्यायालयात न्यायप्रविष्ट असताना भोकरदन पोलिस ठाण्यामार्फत ताबा करून स्थानिक दलित आदिवासी भूमिहीन कास्तकरांचे कोंबड्या, बकर्या, घरे पाडून निर्वासित केले आहे. त्या विरोधात शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख ॲड.भास्करराव मगरे यांच्या मार्गदर्शनाखाली विराट जनआक्रोश मोर्चा जालना जिल्हाधिरी कार्यालयावर २१ एप्रिल सोमवारी ११.३० वाजता अंबड चौफुलीपासून सुरुवात होणार असून ते जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहे. या अति विराट मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन संयोजक आणासाहेब बाळराज, जय खरात, प्रल्हाद साळवे, संदिप काकडे, बाबासाहेब बोबडे, विलास खरात यांनी केले आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.